जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

# प्रेसनोट दिनांक - १६/०१/२०२५

**-:परिमंडळ ०५ कार्यक्षेत्रांतील पोलीस स्टेशनकडील वेगवेगळयां सराईत गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई :-**

पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील गुन्हेगारीवृत्तीस आळा घालणेकामी व प्रतिबंध करणेकामी पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील व सराईत गुन्हेगारांवर ठोस व परिणामकारक अशी कारवाई करणेबाबत मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी आदेश दिलेले होते. सदर आदेशांप्रमाणे परिमंडळ ५ कार्यक्षेत्रांतील सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग व वानवडी विभागांचे अधिपत्याखाली येणारे वेगवेगळया पोलीस स्टेशनकडील सराईत गुन्हेगारांवर दि. १६/०१/२०२५ रोजी महाराष्ट्र पोलीस कायदा क. ५६प्रमाणे हद्दपार कारवाई करण्यात आलेली आहे. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे शहर या कार्यालयाकडून खालील नमुद प्रमाणे एकुण ०३ सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र पोलीस कायदा क. ५६ प्रमाणे हद्दपार कारवाई करण्यात आलेली असुन त्यांना पुणे शहर पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्ह्याचे हद्दीतुन हद्दपार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | आरोपी नाव | हद्दपार कालावधी |
|---|---|---|---|
| १. | वानवडी | विजयसिंग उर्फ पांडु लाखनसिंग कल्याणी, वय २५ वर्षे, रा. साईबाबा मंदिराजवळ, स.नं. ११०, रामटेकडी, हडपसर, पुणे | ०१ वर्षाकरिता हद्दपार |
| २. | मुंढवा | शकील जिलानी शेख उर्फ बागवान, वय २९ वर्षे, रा. तुपेनगर, माळवाडी, हडपसर, पुणे व काळुबाईनगर, वाघोली चौकीमागे, वाघोली, पुणे | ०१ वर्षाकरिता हद्दपार |
| ३. | कोंढवा | फैजान रहेमान शेख, वय २३ वर्षे, रा. मलीकनगर, जे.के. पार्कच्या पुढे, साईबाबा मंदिराजवळ, कोंढवा खुर्द, पुणे | ०२ वर्षाकरिता हद्दपार |

यापुढे देखील सराईत गुन्हेगारांना गुन्हे करण्यापासुन परावृत्त करण्यासाठी व गुन्ह्यांना आळा घालणे तसेच प्रतिबंध होण्याचे दृष्टीकोनातुन अशा प्रकारच्या कारवाया करण्यात येणार आहेत.तसेच वरीलप्रमाणे नमुदहद्दपार करण्यात आलेले सराईत गुन्हेगार हे त्यांचे हद्दपार कालावधीमध्ये **पुणे शहर पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हयामध्ये** दिसुन आल्यास तात्काळ **पोलीस नियत्रंण कक्ष संपर्क क्र.११२** तसेच जवळील अथवा संबंधित पोलीस ठाणेस किंवा इकडील **कार्यालयात संपर्क क्र. ०२०-२६८६१२१४** यावर संपर्क साधुन माहिती कळविण्याबाबत अवाहन करण्यात येत आहे.

**डॉ.राजकुमार शिंदे**(भा.पो.से.)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५,
पुणे शहर.